## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

### तक्रार क्रमांक : ९११/२०२२

**तक्रारकर्ता,** श्री.रुद्रमणी पांडे,
बॅरेक क्र.७३४ च्या समोर, शास्त्री नगर
अे.टी.पी.हिंदी शाळेजवळ, उल्हासनगर ३
जि.ठाणे ४२१ ००३.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, न्यू ईरा इंग्रजी प्राथमिक शाळा,
उल्हासनगर ३ ता.उल्हासनगर जि.ठाणे ४२१००३.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, न्यू ईरा इंग्रजी प्राथमिक शाळा,
उल्हासनगर ३ ता.उल्हासनगर जि.ठाणे ४२१००३.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १०/९/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ३/९/२०२१ | ---- | ३०/११/२०२१ | २५/१/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.३/३/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही" असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १०/९/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" *अपिलकर्ता ॲड रुद्रमणी पांडे, बॅरेक नं.७३४ च्या समोर शास्त्री नगर, अे.टी.पी हिंदी शाळे जवळ, उल्हासगन ३ जि.ठाणे यांनी शाळा संस्थेकडून १.श्रीम.रिटा आर.पांडे स.शि., २.श्रीम.नीता गुप्ता स.शि., ३.श्रीम.रिया के. धेंगवानी स.शि., या तीन शिक्षकांना दि.०१.०१.२००६ ते दि.३०.०९.२०१६ या कालावधीतील शाळा व्यवस्थपनेकडुन देण्यात आलेले वेतन व भत्ते याबाबत छायांकित प्रती मिळणेस विनंती व इतर माहिती* "

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२५/१/२०२२ रोजी, "*न्यू ईरा इंग्लिश प्राथमिक शाळा उल्हासनगर ३ ही शाळा संस्था विनाअनुदानित अल्पसंख्याक असल्याने माहिती अधिकारात येत नाही. असे आदेश/पुरावा शाळा संस्थेकडे असल्यास तो संबंधित अपिलकर्त्यास विहित मुदतीत दयावा अथवा अपिलकर्त्याने अपेक्षिलेली माहिती, माहिती अधिकार २००५ चे कायद्यान्वये पुढील १५ दिवसात अपिलकर्त्यास द्यावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, न्यु ईरा इंग्रजी प्राथमिक शाळा, उल्हासनगर ३ यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती १५ दिवसात जलद टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.
२. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, न्यु ईरा इंग्रजी प्राथमिक शाळा, उल्हासनगर ३ (दि.३/९/२०२१ व २५/१/२०२२ रोजी कार्यरत असलेले) यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक ३/९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपील आदेशांनतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये,

याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. पुढील सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी व तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी स्वत: उपस्थित रहावे.

४. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.४/११/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० सप्टेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, न्यु ईरा इंग्रजी प्राथमिक शाळा, उल्हासनगर ३ (दि.३/९/२०२१ व २५/१/२०२२ रोजी कार्यरत असलेले) -- **यांना प्रत** --

--प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा प्रशासनाधिकारी,
शिक्षण विभाग, उल्हासनगर महानगरपालिका,
वुडलॅण्ड कॉम्पलेक्स, सी विंग, तिसरा मजला,
उल्हासनगर ४२१००२. **यांचेमार्फत रवाना.** (प्रशानाधिकारी यांनी सदर आदेशाची प्रत तात्काळ संबंधित तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना बजावून पोहोच आयोगास सादर करावी)